04 JUL 2026

सकाळ

# विद्यापीठात वसंतराव नाईक यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी माजी मुख्यमंत्री तथा कृषी क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, डॉ. ज्योतिप्रकाश यादव, संध्या आडसुळे, अनिल साळोखे, शशिकांत साळुंखे उपस्थित होते.

04 JUL 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात वसंतराव नाईक यांची जयंती

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा कृषीक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, डॉ. ज्योतीप्रकाश यादव, संध्या आडसुळे, अनिल साळोखे, शशिकांत साळुंखे यांच्यासह शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

04 JUL 2026

पुढारी

संक्षिप्त

# शिवाजी विद्यापीठात अभियांत्रिकी प्रवेशासाठी स्क्रुटिनी सेंटर सुरू

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालकांच्या सोयीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये प्रवेश मार्गदर्शन व स्क्रुटिनी सेंटर सुरू करण्यात आले आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत ऑनलाईन अर्ज नोंदणी, कागदपत्र पडताळणी, अर्ज निश्चिती तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे. या केंद्रात ऑनलाईन अर्ज भरणे, कागदपत्रांतील त्रुटी दूर करणे, गुणवत्ता यादी, पसंतीक्रम, प्रवेश फेऱ्या, महाविद्यालय निवड व प्रवेश निश्चितीबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले जात आहे. विविध अभियांत्रिकी शाखा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण  रोजगार, उच्च शिक्षण, स्टार्टअप, शिष्यवृत्ती व शासनाच्या योजनांची माहितीही उपलब्ध करून दिली जात आहे. डॉ. प्रवीण प्रभू, डॉ. चेतन आवटी, डॉ. महेश साळुंखे, डॉ. विश्वास पाटील, डॉ. गणेश पाटील यांच्यासह प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करत आहेत. विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता अधिकृत कॅप प्रक्रियेद्वारे प्रवेशासाठी अर्ज पूर्ण करावेत, असे आवाहन प्रभारी संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी केले आहे.

04 JUL 2026

सकाळ

# विद्यापीठात अभियांत्रिकी प्रवेशासाठी 'स्क्रूटिनी सेंटर' सुरू

कोल्हापूर : प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थी, पालकांच्या सोयीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन व स्क्रूटिनी सेंटर (केंद्र) सुरू झाले आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज नोंदणी, कागदपत्र पडताळणी, अर्ज निश्चिती, प्रवेश प्रक्रियेबाबत संपूर्ण मार्गदर्शन या केंद्रामध्ये उपलब्ध आहे.

0 4 JUL 2026

तरुण भारत

# विद्यापीठात आज रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने समूह जनजागृती कार्यक्रम अंतर्गत विद्यापीठातील हंगामी रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी 'प्रशासकीय साक्षरता आणि जीवन कौशल्ये' या विषयावरील वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि.४ रोजी दुपारी ३ वाजता मानव्यविद्या सभागृहात कार्यशाळा होणार असल्याचे उपकुलसचिव विनय शिंदे यांनी सांगितले. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. तसेच ऑनलाईन एम.कॉम., ऑनलाईन एम.एस्सी. (गणित) आणि ऑनलाईन एम.बी.ए. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. हंगामी कर्मचाऱ्यांना या अभ्यासक्रमांची माहिती उपलब्ध करून देणे या उद्देशाने या उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

0 4 JUL 2026

सकाळ

# हंगामी रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी आज उद्‌बोधन वर्ग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे हंगामी रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी 'प्रशासकीय साक्षरता आणि जीवन कौशल्ये' या विषयावर उद्या, शनिवारी दुपारी तीन वाजता मानव्यविद्या सभागृहात उद्‌बोधन वर्ग होणार आहे. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, दूरशिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील मार्गदर्शन करणार असल्याची माहिती उपकुलसचिव विनय शिंदे यांनी दिली.

0 4 JUL 2026

जनप्रवास

# हंगामी रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी आज उदबोधन वर्ग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने समूह जनजागृती कार्यक्रम अंतर्गत विद्यापीठातील हंगामी रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी 'प्रशासकीय साक्षरता आणि जीवन कौशल्ये' या विषयावरील उद्‌बोधन वर्गाचे आयोजन शनिवार, ४ जुलै रोजी दुपारी ३ वाजता मानव्यविद्या सभागृहात करण्यात आले आहे, अशी माहिती उपकुलसचिव विनय शिंदे यांनी दिली. यावेळी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. कृष्णा पाटील मार्गदर्शन करतील.